# असोसिएशन ऑफ कॉलेज अॅण्ड युनिव्हर्सिटी सुपर अॅन्युएटेड टीचर्स, महाराष्ट्र

## ४ थी, वार्षिक सर्व साधारण सभा कार्यवृत्तांत

## वर्ष २०१३-१४

## दिनांक १४/१२/२०१४

सभासद बंधु / भगिनिंनो,

असोसिएशनने वर्ष २०१३-१४ या वर्षात केलेल्या कार्याचा वृत्तांत कार्यकारणीच्या वतीने मी आपल्या समोर सादर करीत आहे.

**१) ऑल इंडिया फेडरेशन ऑफ रिटायर्ड युनिव्हर्सिटी अॅण्ड कॉलेज टीचर्स असोसिएशनशी (एआय फ्रुक्टा) संलग्नता.**

आपली संघटना राष्ट्रीय पातळीवर एआय फ्रुक्टाशी संलग्न झाली आहे. दिनांक १९/०१/२०१४ रोजी एआय फ्रुक्टा च्या बैठकीस असोसिएशनच्या वतीने डॉ. जे. एम. मंत्री व डॉ. एम. डी. जहागिरदार हे हैद्राबाद येथे गेले होते. या बैठकीत डॉ.जहागिरदार यांनी आपल्या असोसिएशन ने आता पर्यंत केलेल्या कार्याची माहिती दिली. बैठकीमध्ये आपल्या संघटनेचे अध्यक्ष डॉ. एम.ए. वाहूळ यांची एआयफ्रुक्टाच्या उपाध्यक्षपदी, डॉ.एम. डी. जहागिरदार यांची राष्ट्रीय सेक्रेटरीपदी तर डॉ. जे.एम. मंत्री यांची ऑल इंडिया फेडरेशनच्या न्युज बुलटीवनर सहसंपादक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**२) सोलापूर, कोल्हापूर, कराड, बैठक :-**

फेब्रुवारी महिन्याच्या दुस-या आठवडयात डॉ. एम.ए. वाहूळ, प्राचार्य मोहंमद शफी, प्रा. एस.बी.नाफडे, डॉ. एम.डी. जहागिरदार, प्रा.ए.बी. पाटील यांनी खालील शहरात बैठका घेतल्या व सभासदाचे प्रश्न समजून योग्य ते मार्गदर्शन केले. दिनांक ०८/०२/२०१४ रोजी सोलापूर येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालय, दिनांक ०९/०२/२०१४ रोजी सकाळी कमला महाविद्यालय कोल्हापूर तर संध्याकाळी कराड येथे सदगुरु गाडगे महाराज, महाविद्यालय येथे बैठक घेण्यात आली.

**३) अकोला, अमरावती भेट :-**

मार्च महिन्यामध्ये संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व डॉ. एम. डी. जहागिरदार यांनी अकोला येथे संघटनेची पहिलीच बैठक घेतली. तेथे संघटनेच्या कार्याची माहिती देऊन त्या सभासदांचे प्रश्न जाणून त्यांना मार्गदर्शन केले. या बैठकीचे आयोजन प्रा. हजारे व प्रा. भंडारी यांनी केले.

आपल्या संघटनेच्या कार्याने प्रभावित होऊन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ सेवानिवृत्त प्राध्यापक संघटनेचे सेक्रेटरी डॉ.आर.जी.देशमुख यांच्या पुढाकाराने कृषि विद्यापीठात आपल्या संघटनेचे अध्यक्ष डॉ.एम.ए. वाहूळ यांचा कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु

डॉ.गोविंदराव भराड यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ.जे.एम.मंत्री,प्राचार्य मोहंमद शफी, प्रा.एस.बी.नाफडे व डॉ.एम.डी.जहागिरदार यांचाही सत्कार करण्यात आला.

दुस-या दिवशी अमरावती येथे संघटनेची बैठक घेण्यात आली. अमरावती विभागाचे काम व्यवस्थित नसल्यामुळे नवीन विभागीय कार्यकारणी गठीत करण्या बाबत पदाधिका-यांनी मार्गदर्शन केले.

**४) एआयफ्रुक्टा बैठक :- (दिनांक १५/०६/२०१४)**

हैद्राबाद येथे एआयफ्रुक्टाच्या बैठकीस डॉ. एम.ए. वाहूळ, प्राचार्य मंत्री जे.एम., सचिव मोहंमद शफी व डॉ.एम.डी.जहागिरदार उपस्थित होते. या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेत ७ वा वेतन आयोगासमोर विचारार्थ आपल्या मागण्याचा मसुदा तयार करण्यासाठी एआयफ्रुक्टाचे जनरल सेक्रेटरी के.टी.व्यंकटचार्यालु व डॉ. एम.डी. जहागिरदार यांची समिती गठण करण्यात आली.

**५) पीएच.डी.वेतन वाढ :-**

वर्ष १९८६ पूर्वीच्या पीएच.डी.धारकांना अनुज्ञेय वेतनवाढी शासनाने दिल्या नव्हत्या. वर्ष २०१२ मध्ये २५ याचिकाकर्त्यासाठी असोसिएशनने याचिका दाखल केली होती. या याचिकेमध्ये प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सेवानिवृत्तांचा सहभाग होता. या याचिकेचा निकाल आपल्या बाजुने लागला. याचिकाकर्त्याच्या थकबाकी वितरणाची रक्कम सुमारे ८५,००,०००/- लाख रुपये विद्यापीठास मिळाले. लाभधारकास धनादेश टपालाने पाठविणे ऐवजी विद्यापीठाने खास कार्यक्रम घेऊन वितरण करावे असा असोसिएशनचा आग्रह होता. त्या प्रमाणे विद्यापीठाने दिनांक ५ जुलै २०१४ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करुन सुमारे ८५ लाभधारकांना धनादेशाचे वितरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी.ए. चोपडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एम.ए. वाहूळ, प्राचार्य मोहंमद शफी, प्रा.एस.बी.नाफडे, डॉ.एम.डी.जहागिरदार व प्रा.ए.आर.कुळकर्णी असोसिएशनच्या वतीने उपस्थित होते.

**६) कोल्हापूर, सोलापूर विभाग भेट :-**

डिसेंबर २०१४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे यजमान पद कोल्हापूर विभागाने स्विकारले आहे. त्या सभेच्या नियोजनासाठी दिनांक १५/०७/२०१४ रोजी कोल्हापूर येथे बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत मार्गदर्शन करण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष डॉ. एम.ए. वाहूळ, उपाध्यक्ष डॉ.जे.एम. मंत्री, जळगांव विभागाचे अध्यक्ष प्राचार्य, आर.डी. राणे, प्रा.ए.बी. पाटील, पुणे विद्यापीठ विभागाचे अध्यक्ष डॉ.एम.एन.जाचक, प्रा. बी.एम.देवरे हे उपस्थित होते. या बैठकीत वर्ष २०१४ साठी स्मरणिका प्रकाशित करण्याचे ठरविण्यात आले. खालील प्रमाणे संपादक मंडळाचे गठण करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| समन्वयक | - | प्राचार्य डॉ. जे.बी.चौगुले जे.बी. |
| मार्गदर्शक | - | प्रा.ए.बी. पाटील |
| संपादक मंडळ | - | प्राचार्य, विश्वास साईनाकर,प्राचार्य, पी.वाय. मद्रन्ना<br>डॉ. पी.व्ही. सोहनी प्राचार्य पी.जे. ताम्हणकर |

दिनांक १६ जुलै २०१४ रोजी वरील औरंगाबाद व जळगांव येथील सदस्यांनी सोलापूर विभागाच्या बैठकीत उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी प्राचार्य के.एम. जमादार यांची विशेष उपस्थिती होती बैठकीचे आयोजन डॉ.आर. जी.बीडकर यांनी प्रा.एम.ए. शेख यांचे निवासस्थानी केले. बैठकीनंतर सहसंचालक सोलापूर विभाग यांची भेट घेऊन सेवा निवृत्तांचे प्रश्न लवकर सोडविण्याची विनंती त्यांना करण्यात आली.

**७) ना.राजेश टोपे - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांची भेट :-**

आपल्या अनेक प्रलंबित मागण्यासाठी दि.११ ऑगस्ट २०१४ रोजी ना. राजेश टोपे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, यांची डॉ. एम.ए. वाहूळ, डॉ. जे.एम.मंत्री व डॉ.एम.डी. जहागिरदार यांनी जालना येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन निवेदन दिले.न्यायालयीन निवाडया नंतरही सेवानिवृत्तांच्या प्रश्नांकडे विभागाचे अधिकारी लक्ष देत नसल्यामुळे सेवानिवृत्तांना होणा-या त्रासाकडे आणि शासनास विनाकारण न्यायालयीन खर्च करावा लागत असल्याकडे त्यांचे लक्ष वेधले. भविष्यात आपले प्रश्न त्वरीत निकाली काढण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

**८) औरंगाबाद बैठक :-**

आपल्या संघटनेच्या स्थापनेस ५ वर्ष पुर्ण होत आहे. त्यामुळे घटनेप्रमाणे निवडणूका घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने दिनांक १८/०८/२०१४ रोजी कार्यकारणीची एक बैठक औरंगाबाद येथे घेण्यात आली. या बैठकीसाठी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठ विभागाचे अध्यक्ष / सचिव यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्या बैठकीमध्ये निवडणूकीचे नियम तयार करण्यात आले.

**९) ७ व्या वेतन आयोगासाठी निवेदन :-**

केंद्र शासनाने ७ व्या वेतन आयोगाची स्थापना केली आहे. आधीच्या वेतन आयोगाप्रमाणे त्रुटी राहू नये म्हणून त्या वेतन आयोगास आपले प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने देण्यात येणा-या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एआयफ्रुक्टाच्या जनरल सेक्रेटरी बरोबर आपल्या पदाधिका-यांची दिनांक ०२/०९/२०१४ रोजी औरंगाबाद येथे बैठक घेण्यात आली. ६ व्या वेतन आयोगात आलेल्या अडचणी लक्षात घेऊन एक मसुदा तयार करण्यात आला व तो प्रस्ताव ७ व्या वेतन आयोगास देण्याचे ठरविण्यात आले. या बैठकीत आपल्या असोसिएशनच्या वतीने डॉ. एम.डी. जहागिरदार यांचा आणि संघटनेच्या सर्व पदाधिका-यांचा सहभाग होता.

**१०) ऑल इंडिया फेडरेशन राष्ट्रीय अधिवेशन :-**

दिनांक २१/०९/२०१४ रोजी ऑल इंडिया फेडरेशन ऑफ रिटायर्ड युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स असोसिएशन चे तृत्तीय अधिवेशन औरंगाबाद येथे असोसिएशनच्या वतीने घेण्यात आले. देशभरातील १२ राज्यातील महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षकांच्या संघटना संलग्नित आहेत. अधिवेशनाचे उदघाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी

कुलगुरु डॉ.विठ्ठलराव घुगे यांनी केले. या अधिवेशनात नवीन राष्ट्रीय कार्यकारणीची निवड एकमताने करण्यात आली. आपणा सर्वांना कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, आपल्या संघटनेचे मा. अध्यक्ष डॉ.एम.ए. वाहूळ यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर डॉ.जे.एम. मंत्री यांची उपाध्यक्ष, राष्ट्रीय सेक्रेटरी डॉ.एम.डी.जहागिरदार, प्राचार्य मोहंमद शफी व विभागीय सचिव प्राचार्य, आर.डी. राणे तर कार्यकारणीत सदस्य म्हणून पुणे विभागाचे डॉ.एम.एन. जाचक, औरंगाबाद विभागाचे डॉ.जी.एम. कुळकर्णी, जळगांव विभागाचे प्रा.ए.बी.पाटील यांची निवड झाली. आपल्या असोसिएशनच्या वतीने या सर्वांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

**११) जळगांव विभाग भेट :-**

जळगांव विभागाचे प्रा. ए.बी. पाटील यांची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजी कोल्हापूर येथे संघटनेची वार्षिक सभा होत आहे. त्यावेळी होणा-या निवडणूकीची पुर्वतयारी करण्यासाठी दिनांक १२/१०/२०१४ रोजी डॉ. एम. ए. वाहूळ, डॉ. जे.एम. मंत्री व प्रा. एस.बी.नाफडे यांनी जळगांव येथे जाऊन प्रा.ए.बी. पाटील यांच्याशी या बाबत सविस्तर चर्चा केली.

**१२) कोल्हापूर - सांगली - सोलापूर बैठक :-**

कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष डॉ. मानसिंगराव जगताप यांच्या विनंतीनुसार संघटनेचे पदाधिकारी व प्रा. ए.बी.पाटील यांनी कोल्हापूर येथे दिनांक ०२/११/२०१४ रोजी भेट दिली या आयोजित बैठकीमध्ये (१) १४ डिसेंबर २०१४ च्या सर्वसाधारण सभेचे नियोजन, (२) ६ व्या वेतन आयोगातील ग्रॅच्युईटीच्या फरकातील रक्कम मिळणे बाबत, (३) ४ था, ५ वा व ६ वा वेतन आयोगातील वेतन सुधारणा याचिका यावर चर्चा झाली. दुपारी वार्षिक सभेचे नियोजित स्थळ, तेथील व्यवस्थे बाबत चर्चा करण्यात आली.

सायंकाळी सांगली येथे स्मरणिकेच्या संपादक मंडळाची बैठक घेऊन चर्चा करण्यात आली. दिनांक ०३/११/२०१४ रोजी सोलापूर विभागात उपस्थित राहून सभासदांन संघटनेच्या कार्याची माहिती देण्यात आली.

**१३) नांदेड बैठक :-**

दि. १६/११/२०१४ रोजी डॉ.एम. ए. वाहूळ, डॉ.जे.एम.मंत्री, प्रा.एम.डी.जहागीरदार व प्रा.अरुण कुलकर्णी यांनी नांदेड विभागास भेट दिली.पिपल्स महाविद्यालयात सकाळी ११.३० आयोजित बैठकीत वसमत, अहमदपूर, धर्माबाद, लातूर व उदगिर वगैरे ठिकाणाहून आलेले एकूण ५० सभासद उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला वर्ष २०१३-१४ मध्ये दिवंगत प्रा. एस.पी.साबु व इतरांना श्रध्दांजली देण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक विभागीय सचिव डॉ.व्ही.डी.देशपांडे यांनी केले. यावेळी नवनिर्वाचित एआयफ्रुक्टाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.एम.ए. वाहूळ, उपाध्यक्ष

डॉ.जे.एम.मंत्री व राष्ट्रीय सचिव डॉ.एम.डी.जहागीरदार यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.एन.इंगोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना डॉ.एम.डी.जहागीरदार यांनी उत्तरे दिली. डॉ.जे.एम. मंत्री यांनी न्यायालयीन याचिकेसंबंधी प्रगतीची माहिती दिली.बैठकीत चर्चिले गेलेल्या प्रश्नांचा आढावा घेऊन मा.अध्यक्षांनी समारोप केला. व दिनांक १४/१२/२०१४ रोजी कोल्हापूर येथे वार्षिक सभेस सभासदांना उपस्थित राहण्याचे आवाहन केल. डॉ.बोराळकर यांनी आभार मानले. कार्यक्रम सुरु असतांना धुळयाचे माजी प्राचार्य शिवाजी सावंत यांच्या दुखःद निधनाची माहिती समजली त्यांच्या कार्याची माहिती देऊन सभागृहाने त्यांना श्रध्दांजली अर्पित केली.

**एआयफ्रुक्टाच्या कार्यकारणीची बैठक :-**

दिनांक १६/११/२०१४ दुपारी ३.०० वाजता पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथे एआयफ्रुक्टाच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक मा. अध्यक्ष डॉ.एम.ए.वाहूळ यांचे अध्यक्षतेत घेण्यात आली. जनरल सेक्रेटरी प्रा.के.टी. व्यंकटाचार्यालू यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. त्या नंतर झालेल्या चर्चेत डॉ.एम.डी.जहागीरदार, डॉ.सीएच चंद्रय्या, प्राचार्य एम. संतोषकुमार, डॉ.के.एस.एन.रेड्डी व फायनान्स सेक्रेटरी प्रा.पी.लक्ष्मीपती यांनी सहभाग घेतला. संघटनेची भावी दिशा ठरविण्यासाठी व ७ व्या वेतन आयोगा समोर आपले प्रश्न मांडण्यासाठी एका ४ सदस्यीय समिती डॉ. एम.ए. वाहूळ यांचे अध्यक्षतेखाली गठण करण्यात आली.

मा.अध्यक्षांनी संघटनेची भावी दिशा, व्यवस्थापन व कामाचे नियोजन याबाबत विचार व्यक्त करुन समारोप केला. नांदेड विभागाने बैठकीची उत्तम व्यवस्था केली होती. त्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

**न्यायालयीन याचिका :-**

न्यायालयीन याचिकेची सर्व माहिती दरवर्षी सर्वसाधारण सभेत देण्यात येते. पाच वर्षामध्ये एकूण २४ याचिका आपण उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केल्या होत्या. त्यापैकी १६ याचिकांचा निकाल आपल्या बाजूने लागला आहे. एकूण १६१८ आपले सदस्य आहेत त्यापैकी जवळ जवळ ३०८८ याचिका कर्त्यांना लाभ मिळाला किंवा मिळेल. शिवाय सदस्येतर अनेक सेवा निवृत्तांना देखील याचा लाभ झाला आहे हे या ठिकाणी आर्वजून नमुद करावेसे वाटते. वर्ष २०१३-१४ मध्ये खालील याचिका आपण दाखल केल्या.

१) **कुंठीत वेतन वाढ :-** ७ वी याचिका क्र. ३१४२ /२०१४ याचिकाकर्ते ७९ खंडपीठ औरंगाबाद दिनांक २५/०३/२०१४.

२) **ग्रॅच्युईटी :-** सहाव्या वेतन आयोगात ऑगस्ट २००९ पुर्वीच्या सेवानिवृत्तीधारकांना रुपये ७ लाख मिळण्यासाठी दिनांक ०८/०४/२०१४ क्र.५२०६/२०१४ याचिकाकर्ते ३३३.

३) **ग्रॅच्युईटी बाबत :-** अवमान याचिका क्र.३७०/२०१२ करिता सुप्रिम कोर्ट क्र.२७७ / २०१४ निकाल आपल्या बाजुने व या प्रयत्नामुळे शासनाने दि. ४ ऑगस्ट २०१४ रोजी एकोणचाळीस कोटी चौसष्ट लाख त्र्यानौव हजार रुपये खंडपीठ, औरंगाबाद येथे जमा केले आहे. याबाबत लाभधारकांची यादी शासनाने खंडपीठात दाखल केली आहे. मात्र त्यातील नांवे स्पष्ट वाचता येत नसल्यामुळे नवीन यादी दाखल करण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत. (एकूण लाभधारक १८८३)

४) **सेवानिवृत्ती वेतन सुधारणा :-** ४ था वेतन आयोग याचिकाकर्ते ४५ दिनांक १६/०४/२०१४ याचिका क्र.५२०४ /२०१४ खंडपीठ, औरंगाबाद - न्याय प्रविष्ठ

५) **६ वा वेतन आयोग :-** ६ व्या वेतन आयोगातील समकक्ष वेतन श्रेणीमध्ये कमीत कमी ५०% वेतन निश्चिती साठी दिनांक ०१/०९/२००९ पुर्वीच्या सेवानिवृत्ती धारकांसाठी याचिका क्र.४७१/२०१४, दिनांक ०९/०६/२०१४.याचिकाकर्ते १५५ खंडपीठ, औरंगाबाद. याबाबतचा निकाल दिनांक २७/११/२०१४ रोजी आपल्या बाजुने लागला आहे. हे आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे.

धन्यवाद !

**डॉ. जे.एम. मंत्री**
उपाध्यक्ष